# नागपूर  महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क  विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **नागपूर, दि. १९ ऑगस्ट २०१९**

# मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना आज पालकमंत्र्यांच्या हस्ते सायकल वाटप

**नागपूर, दि. १९ :** नागपूर महानगर पालिकेच्या सायकल बँक योजने अंतर्गत मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मंगळवारी (ता.२०) विवेकानंद नगर हिंदी माध्यमिक शाळेत आयोजित कार्यक्रमात सायकल वितरण करण्यात येणार आहे.
सकाळी १० वाजता आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार राहतील. सत्तापक्ष नेते संदीप जोशी, शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, उपसभापती प्रमोद तभाने यावेळी उपस्थित राहतील.
कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर यांनी केले आहे.

# सदभावना दिनानिमित्त मनपा कर्मचारी घेणार शपथ

**नागपूर, ता. १९ :** दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (ता. २०) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात मनपा पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सदभावना दिनाची शपथ घेतील.
सकाळी ११ वाजता महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, सत्ता पक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर भारतरत्न राजीव गांधी यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करतील. त्यानंतर उपस्थितांना सदभावना दिनाची शपथ देतील.